# Arts & Commerce College,Warwat Bakal, Tq. Sangrampur

## Research Paper-2022-2023

| Sr. No. | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | Impact Factor | ISBN/ISSN |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Changing nature of Indian agriculture | S. R. Gurjar | Economics | B. Adhar multidisciplinary international research journal | 2022-23 | 8.575 | ISSN-2275-9308 |
| 02 | Impact of Covid-19 on various sectors | S. R. Gurjar | Economics | Research Nebula | 2022-23 | 7.399 | ISSN-2277-8071 |
| 03 | Sustainable development and Environment | S. R. Gurjar | Economics | Vidyawarta Peer reviewed International multilingual research journal | 2022-23 | | ISSN-2319-9318 |

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**July -2022**

(CCCLVI ) 356






Chief Editor
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

CamScanner

(SJIF) Impact Factor-8.575

ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**July-2022**

**ISSUE No- (CCCLVI) 356**





**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

CamScanner

| | | |
|---|---|---|
| 18 | साम्राज्यवादी इतिहासलेखन प्रवाह डॉ. अनंत आ. रिठे | 83 |
| 19 | 'सामंजस्य करारनामा' आणि भारतीय सार्वजनिक उपक्रम डॉ. बाळासाहेब निर्मळ | 86 |
| 20 | राष्ट्रपती प्रतिभा पाटील व्यक्ति आणि कार्य : विश्लेषणात्मक अभ्यास प्रा.डॉ. माधव.शं. वाघमारे | 90 |
| 21 | 'यशोधरा' कादंबरीने बौद्धविचाराला दिलेली गतिमानता प्रा. डॉ. पुरूषोत्तम नंदेश्वर | 93 |
| 22 | भारतीय राज्यघटना निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान व विचार – एक राजकीय अध्ययन नितीन तुळशीराम सडमाके | 99 |
| 23 | भारतातील महिला चळवळीसमोरील आव्हाने प्रा. डॉ. सौ. सुनिता एस.राठोड | 103 |
| 24 | प्राचीन भारतातील कायदा व न्यायव्यवस्था प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी | 108 |
| 25 | कर्नाटकातील निवडक वीरगळ : शिमोगा जिल्ह्याच्या विशेष संदर्भासह प्रा. डॉ. जयश्री रमेश कुलकर्णी-देशमुख | 112 |
| 26 | होलार जातीची शैक्षणिक, आर्थिक स्थिती आणि संघटनात्मक परिवर्तनाचा अभ्यास नितीन गुलाबराव पाटील , प्रा. डॉ. सुधाकर लोटन जाधव | 118 |
| 27 | आव्हानांच्या विळख्यातील आधुनिक भारतीय लोकशाही विक्की अशोक रामटेके | 122 |
| 28 | पर्यावरणासाठी जनजागृतीची आवश्यकता प्रा.शशिकांत पी. दुपारे | 128 |
| 29 | अण्णा हजारेंनी भ्रष्टाचार निर्मूलनासाठी राज्यशासना विरूध्द केलेली आंदोलने देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 131 |
| 30 | भारतीय शेतीचे बदलते स्वरूप प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर | 139 |

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 356 (CCCLVI) A

# भारतीय शेतीचे बदलते स्वरूप

प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला बाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, जि. बुलढाणा
मो. नं. 9423912821,मेल : gurjarsr11@gmail.com

**प्रस्तावना :—**

शेतीचा शोध साधारणपणे १०००० वर्षापूर्वी मध्यपूर्वेतील पॅलेस्टाईन, जॉर्डन, इस्त्राईल, सिरीया, तुर्कस्थान या भागात लागला. सुरूवातीला शेती कसण्याची पध्दती ही प्राथमिक अवस्थेत होती. शेतीची कामे जसे मशागत, पेरणी, इतर कामे हातानेच करण्यात येत होती. त्यानंतर त्याला गुरेढोरांची मदत झाली. भारतीय शेतीला साधारणत: ६५०० वर्षाचा इतिहास असल्याचे दिसून येते. पूर्वी प्रामुख्याने उदरनिर्वाहाकरीता शेती केली जात होती व ती शेती प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असल्यामुळे त्यातून ज्वारी, बाजरी, नाचणी, तूर, उडीद, मूंग, तांदूळ, चना इत्यादी धान्य पिके व वांगे, मुळा, काकडी, टोमॅटो यासारख्या भाज्या व ऊस, कापूस, तीळ, करडई, जवस, ज्यूट इत्यादी नगदी पिके घेतल्या जात होती. त्यामुळे जीवन जगण्याचे महत्तवाचे साधन म्हणून शेतीकडे पाहिल्या जात होते. परिणामी उत्तम शेती, मध्यम उद्योग व कनिष्ठ नोकरी ही संकल्पना कार्यान्वित होती. शेतीची सुपीकता टीकवून ठेवणे व स्थानिक वातावरणात उत्पादन होईल अशा काटक बियाण्याचा वापर करण्यावर पूर्वी शेतकऱ्यांचा भर होता. म्हणून भारतीय शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा म्हटल्या जात होते. परंतु आजच्या औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमध्ये भारतीय शेतीचे स्वरूप बदलले असल्याचे दिसून येते.

**ब्रिटीश काळातील शेती :—**

ब्रिटीशांच्या आगमनापूर्वी शेतकरी शेती व्यवस्थापनाबाबत स्वतंत्र होता. सर्व निर्णय तो स्वत: घेत असे. परंतु ब्रिटीश राजवटीत त्यावर बंधने आली. जमिनी वरील शेतसाऱ्यामध्ये ५० टक्केपर्यंत वाढ करण्यात आली. त्याच बरोबर अन्नधान्य पिकापेक्षा नगदी पिकांवर भर देण्यात आला. या ब्रिटीशांच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यातूनच जमिनदारांचा व सावकारांचा नवीन वर्ग तयार झाला. वाढता शेतसारा भरण्याकरीता शेतकाऱ्यांच्या कर्जबाजारीपणात वाढ व्हायला लागली. कर्ज परतफेड करू न शकल्यामुळे शेकऱ्यांच्या जमिनी सावकारांनी ताब्यात घेणे सुरू केले होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दारीद्रयामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. अशातच मोठमोठे दुष्काळ भारतात येवून गेले. त्यामध्ये हजारो लोक मृत्यूमूखी पडले. त्यातच मिलो सारख्या नित्कृष्ट ज्वारीची चव भारतीयांना नेहमी स्मरणात राहीली. एकंदरीतच ब्रिटीशांच्या राजवटीमध्ये भारतीय शेती व शेतकऱ्यांची दुरावस्था झाल्याचे दिसून येते.

**स्वातंत्र्यानंतरचा काळ :—**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकार पुढे अन्नधान्याची कमतरता शेतीविषयक धोरण राबविणे व दुष्काळावर मात करणे अशा प्रकारच्या समस्या होत्या. या सर्वातून मार्ग काढण्याकरीता देशाला अन्नधान्य निर्मितीत आत्मनिर्भर करण्यासाठी हरीतक्रांती या नविन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे निश्चित करण्यात आले. या माध्यमातून संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर करून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरवर्षी नविन संकरित बियाणे वापरल्यामुळे भारतात संकरित बियाण्यांची उलाढाल साधारणत: १२५०० कोटी रुपयाच्या वर आहे. त्याचबरोबर जमिनीचा पोत सुधारण्या करिता पूर्वी शेणखत, हिरवळीचे खत यांचा वापर केल्या जात होता. परंतु आता रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्या जात आहे. त्याच बरोबर संकरीत बियाण्यांची प्रतिकारक्षमता कमी असल्यामुळे ती पिके लवकर रोगराईला बळी पडतात. तसेच कीटकनाशकांचा मोठया प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. परीणामी उत्पादनाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत असले तरी मात्र शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून कारण ज्या प्रमाणात कृषी आदानांच्या कींमतीमध्ये वाढ झाली त्याप्रमाणात शेतमालाच्या कींमतीमध्ये फारशी वाढ झाल्याचे दिसून येत नाही. शेतीचा वाढता खर्च व

कर्जबाजारीपणामुळे भारतीय शेतकरी आत्महत्या सारख्या प्रवृत्तीकडे वाटचाल करीत असल्याचे दिसून येते.

**शेतीचे बदलते स्वरुप :–**

पूर्वी शेतीकडे उदरनिर्वाहाचे महत्वाचे साधन म्हणून पाहल्या जात होते. त्यामुळे आपल्याला वर्षभर आवश्यक असलेली अन्नधान्य व भाजीपाला शेतीतून उत्पादीत केल्या जात होती. पूर्वी सिंचनाच्या सोयी फारश्या अस्तित्वात नसल्यामुळे विहीरी, तलाव व मोटव्दारे बागायती शेती केल्या जात होती. त्याचबरोबर एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात असल्यामुळे कुटुंबप्रमुखाच्या मदतीने शेतीबाबतचे सर्व निर्णय घेतल्या जात होते. परंतु बदलत्या परिस्थितीमुळे व औद्योगिकीकरणामुळे भारतीय शेतीची रचना बदलल्याचे दिसून येते. उदरनिर्वाहाकरिता केली जाणारी शेती आता व्यावसायिक शेती झाली आहे. मोटव्दारे केल्या जाणाऱ्या शेती ऐवजी आज मोटारपंप, कालवे, धरणे, ट्यूबवेल्स याव्दारे मोठ्याप्रमाणावर सिंचनाची शेती केल्या जात आहे. पूर्वी विशिष्ट काळातच हिरवा भाजीपाला मिळत होता तो आज वर्षभर मिळत आहे. पूर्वी हंगामाच्या वेळीच फळफळावळे मिळत होती, परंतु आता वर्षभर मिळतात. त्याचबरोबर बहुपीक पद्धती अस्तित्वात आल्यामुळे सर्वच पिकांच्या बाबतीत क्रांती झाल्याचे दिसून येते. आज संशोधनाचे स्वरुप व्यापक झाल्यामुळे शेतीबरोबरच शेतीशी संलग्नित असणाऱ्या उद्योगामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. शेतीला जोड म्हणून दुग्धव्यवसाय, शेळी–मेंढीपालन, कुक्कुटपालन, मधमाश्यापालन, इमू पालन, ससेपालन, वराहपालन, फळे उत्पादन, फुले उत्पादन, औषधी वनस्पती उत्पादन, मसाले उत्पादन इत्यादी उद्योग करण्यात येवू लागले. तसेच हरीतक्रांती इत्यादी क्रांती बरोबर श्वेतक्रांती, पिवळीक्रांती, मस्यक्रांती घडून आल्यामुळे शेतीचे स्वरूप मोठ्याप्रमाणात बदलल्याचे दिसून येते.

**आधुनिकतेचे परिणाम :–**

भारतात आधुनिकीकरणामुळे शेतीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत असले तरी त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जमिनीची धूप, क्षारयुक्त जमीन, सुपिकतेत घट, रसायनाच्या अतिवापरामुळे जमिन व पाण्याचे प्रदूषण त्यामुळे विषयुक्त झालेले अन्नधान्य यासारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. पंजाब प्रांत हा एकेकाळी हरीतक्रांती तंत्रज्ञानाच्या वापरात व धान्य उत्पादनात आघाडीवर होता. परंतु आज त्याची ओळख भारताचा कॅन्सर प्रांत म्हणून नविन ओळख देतो. कारण रसायनाच्या अतिवापरामुळे दुषित पाणी व धान्य यामुळे या भागात कॅन्सरच्या रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

**बिटी बियाण्यांची उपलब्धता :–**

एखादया सजीवाच्या पेशीतील पाहिजे ते जनुके के दुसऱ्या सजीवाच्या पेशीतील जनुकरचनेशी जोडून नविन जनुकीय संस्कारीत जात विकसीत करण्यात येत आहे. अशाप्रकारे यातून बिटी कापूस, बिटी सोयाबिन, बिटी मका यांच्या नविन जाती निर्माण करण्यात आल्या आहेत. या बियाण्यामध्ये अस्तित्वात असलेल्या विषामुळे कोणतीही कीड या पिकावर तग धरू शकत नही. अशा बियाणापासून मिळणाऱ्या नफ्याचा विचार करता यापुढे पानकोबी, फुलकोबी, भेंडी, वांगे, टोमॅटो, बटाटे यासारख्या भाज्यांची व तांदूळ, भूईमूग, मोहरी, एरंड यासारख्या महत्वपूर्ण पिकांचे नविन संस्करित वाण तयार करण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्याचबरोबर राऊंडअप व ग्लायकोफोसॅट अशा घातक तणनाशकांचा वापर मोठया प्रमाणात सुरू असल्याचे दिसून येते. या सर्व वापरामुळे जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे. अशाप्रकारे आज आपण अधिक उत्पादन घेण्याच्या हव्यासापोटी अधिक घातक रसायनांचा वापर करीत असल्यामुळे सजीवांना विविध रोगांना बळी पडावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**जैविक शेती:–**

रासायनिक साधनांचा वापर थांबवून नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन, संवर्धन व पर्यावरणाचा समतोल व आरोग्यदायी मानवी जीवन जगण्याकरीता दिर्घकालीन शेती नियोजन करणे म्हणजे जैविक शेती पध्दती होय. रासायनीक खते, बि–बियाणे, कीटकनाशके यांचा अतिरिक्त खर्च टाळून शेतीची गुणवत्ता टीकविणे, मानवी आरोग्यावरील दुष्परीणाम कमी करणे, माती प्रदूषण, वायू



CamScanner

प्रदूषण याला आळा घालून पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता जैविक शेतीचा अवलंब करणे महत्वाचे आहे. कमी जागेत शेडनेटचा वापर करून फळे, फुले, भाजीपाल्याचे उत्पादन यामुळे करता येणे शक्य होईल. त्याचबरोबर आपत्तीपासून होणाऱ्या नुकसानाचे प्रमाण याव्दारे कमी करता येईल. जैवतंत्रज्ञानामुळे फळे, भाजीपाला, धान्य, डाळवर्गीय पिके, तेलबिया इत्यादी पिकांमध्ये पोषक तत्वे, चविष्टता, टिकावूपणा, कमी वेळात उत्पादन इत्यादी गुण दिसून येतील. त्यामुळे मानवाच्या आरोग्यावर अनुकूल परिणाम होण्यास मदत होवू शकेल. जैवतंत्रज्ञानामुळे नविन पिकपदधतीला चालना मिळण्यास वाव आहे. थॉम्पसन आणि मॉर्गन या कंपनीने ब्रिटीश टोमॅटो आणि पोटॅटो हे सोलॅन्सिस या एकाच कुळातील असल्याहुळे त्या दोन मिळून 'टोमॅटो' या पिकाची जात शोधून काढली. टोमटॅटो या रोपापासून जमिनीच्या खाली बटाटा आणि जमिनिच्या वर टोमॅटो असे दुहेरी उत्पादन घेता येणे शक्य होणार आहे. जैविक पदधतीने उत्पादीत केलेल्या शेतमालाला आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे. भारतातील जैविक शेतीमालाला युरोप, अमेरीका, कॅनडा इत्यादी देशात निर्यात केली जाते. अशाप्रकारे आर्थिक बाबतीत विचार केला असता जैविक शीती गरीब शेतकऱ्यांना गरीबीच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यास मदतगार ठरू शकते.

**मूल्यमापन :—**

ब्रिटीशपूर्व शेती, ब्रिटिश राजवटीतील शेती, स्वतंज्योत्तर काळातील शेती यांचा विचार करता असे निदर्शनास येते की, पूर्वीच्या काळी शेतीला महत्वाचे स्थान होते. शेतीकडे जिवन निर्वाहाचे साधन म्हणून पहिल्या जात होते. जीवन जगण्याकरीता आवश्यक असलेले अन्नधान्य, भाजीपाला, फळे यांचे उत्पादन शेतीतून घेतल्या जात होते. १९६६ च्या दरम्यान भारतात घडून आलेल्या हरीतक्रांतीमुळे शेतीचे आधुनिकीकरण होऊन शेतीमध्ये संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा मोठया प्रमाणात वापर व्हायला लागल्यामुळे शेती उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली. शेतीला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. उत्पादन वाढून अन्नधान्यातील पोषकतत्व, जीवनसत्वे यात घट झाली. त्यामुळे विविध आजारपणाला लोकांना तोंड दयावे लागते. आज जैविक शेतीचा वापर वाढत असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे भारतीय शेतीची वाटचाल पारंपारीकतेकडून हरीतक्रांतीकडे व हरीतक्रांतीकडून जैविक शेतीकडे झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ :—**

१) डॉ. गंगणे वर्षा, (२०२१),'भारतीय कृषिक्षेत्र दशा आणि दिशा', साईज्योती पब्लिकेशन, नागपूर
२) सकाळ ॲग्रोवन, १८ डिसें. २०१६
३) अर्थमिमांसा, खंड १३, अंक १, ( जाने—जून २०२०)
४) महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी, ( २०१७—१८)
५) www.wikipedia.org

i R.A. Sinari, The Ontological Structure of man, in Rama Kant Sinari (ed.), *Concept of Man in Philosophy*, Indian Institute of Advanced Study, Shimla in association with B.R. Publishing Corporation, Delhi, 1991, p. 25.
ii A.C. Kapur, *Principles of Political Science*, S. Chand & Company (Pvt.) Ltd., New Delhi, 1987, p. 746.
iii V.D. Mahajan, *Recent Political Thought*, S. Chand & Co. (Pvt.) Ltd., New Delhi, 1975, p. 638.
iv R.K. Prabhu and U.R. Rao, *The Mind of Mahatma Gandhi*, Navajivan Publishing House, Ahmedabad, 1967, p. 101.
v V.P. Verma, *Modern Indian Political Thought*, Lakshmi NarainAgarwal, Agra, 1980, p. 350.
vi Prof. Deol, *Survey of Modern Indian Political Thought*, Malhotra Book Depot, 1976, p. 135.
vii Suresh Chandra Pant, *Theory of Western Political Thought*, Prakashan Kendra, New Building, Lucknow, 1968, p. 423.
viii V.D. Mahajan, *Recent Political Thought*, S. Chand & Co. (Pvt.) Ltd., New Delhi, 1975, p. 368.
ix V.P. Verma, *Modern Indian Political Thought*, Lakshmi NarainAgarwal, Agra, 1980, p. 343.
x Prof. Deol, *Survey of Modern Indian Political Thought*, Malhotra Book Depot, 1976, p. 119.
xi *Ibid.*, p. 121.
xii R.K. Prabhu and U.R. Rao, *The Mind of Mahatma Gandhi*, Navajivan Publishing House, Ahmedabad, 1967, pp. 251-252.
xiii Prof. Deol, *Survey of Modern Indian Political Thought*, Malhotra Book Depot, 1976, p. 121.
xiv R.K. Prabhu and U.R. Rao, *The Mind of Mahatma Gandhi*, Navajivan Publishing House, Ahmedabad, 1967, pp. 267-268.
xv Suresh Chandra Pant, *Theory of Western Political Thought*, Prakashan Kendra, New Building, Lucknow, 1968, p. 442.
xvi *Ibid.*, p. 434.
xvii V.D. Mahajan, *Recent Political Thought*, S. Chand & Co. (Pvt.) Ltd., New Delhi, 1975, pp. 640-641.
xviii V.P. Verma, *Modern Indian Political Thought*, Lakshmi NarainAgarwal, Agra, 1980, pp. 350-351.



CamScanner

2022-23

ISSN 2277-8071

INDEXED

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

## TWO - DAY 46th ANNUAL CONFERENCE OF

## VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

4th & 5th February, 2023

*Organized by*

## LOKMANYA TILAK MAHAVIDYALAYA, WANI DIST. YAWATMAL

Guest Editor
**DR. PRASAD KHANZODE**
Principal
Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wani, Dist. Yavatmal

Executive Editor
**DR. KARMSING RAJPUT**
Head, Dept. of Economics
Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wani, Dist. Yavatmal

Chief Editor
**DR. G. P. KHANDARE**
Y.C. Arts and Science Mahavidyalaya,
Mangrulpir, Dist. Washim

Special Issue Published on 4th February, 2023
www.ycjournal.net

Scholarsteer

DataCite

JIF

CamScanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399
RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
ISSN 2277-8071


| | | | |
|---|---|---|---|
| 24. | प्रा.डॉ.एम.आर. दातीर<br>सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,<br>जगदंब महाविद्यालय अचलपूरशहर जिल्हा अमरावती | कोविड-१९चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 143 |
| 25. | डॉ. राजू घनश्याम श्रीरामे<br>उपप्राचार्य तथा पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम त. नरखेड जि. नागपूर | भारतिय अर्थव्यवस्था: कोरोना महामारी - विरोधाभास आणि परिणाम | 148 |
| 26. | डॉ.डी.एस.गुर्जर<br>सहा.प्राध्यापक,<br>जयविकास महाविद्यालय, शिरपूर(होरे), ता.देवळी, जि.वर्धा | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 160 |
| 27. | डॉ. राजेश उल्हासराव बुंरगे<br>संचालक,राष्ट्रीय सेवा योजना, सं गा.बा. अमरावती विद्यापीठ,<br>सहयोगी प्राध्यापाक अर्थशास्त्र विभाग<br>श्री शिवाजी कला व वाणीज्य महाविद्यालय,अमरावती | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 165 |
| 28. | सागर शंकर बरशेट्टीवार<br>संशोधक विद्यार्थी<br>प्रा. डॉ. करमसिंग रा. राजपूत<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ | Covid 19 आणि भारतीय शिक्षणव्यवस्था | 170 |
| 29. | प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन<br>प्रोफेसर तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय ,चिखली, जिल्हा बुलढाणा-443201<br>प्रा.डॉ.राजेंद्र कुमार रामराव गव्हाळे<br>प्रोफेसर तथा पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>जी.एस.कॉलेज, खामगाव, जि.बुलढाणा-444312 | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 173 |
| 30. | कु. उषा लक्ष्मणराव घोडे<br>संशोधक, एम.ए. (अर्थशास्त्र ) एम.एड.<br>प्रा. डॉ. गजानन बन्सीलाल बनचरे<br>मार्गदर्शक, एम.ए.एम.फिल.(अर्थशास्त्र) पी.एचडी. | कोरोना महामारीचा पश्चिम विदर्भातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेल्या प्रभावाचे अध्ययन | 178 |
| 31. | प्रा. डॉ. सुभाष रा. गुर्जर<br>अर्थशास्त्र विभागप्रमुख<br>कला वाणिज्य महाविदयालय,वरवट बकाल जि. बुलडाणा | कोविड-19 चे विविध क्षेत्रावरील परिणाम | 181 |
| 32. | प्रा.डॉ.विठ्ठल निळकंठ ठावरी<br>सहा.प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख<br>कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी जि.चंद्रपूर | कोवीड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 185 |
| 33. | प्रा.डॉ.शरयु मनीष पोतनूरवार<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>सरदार पटेल महाविद्यालय ,चंद्रपूर | कोविड १९ चा भारतीय अर्थव्यवस्थेतील केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांवरील परिणाम (विशेष संदर्भ : चंद्रपूर जिल्हा) | 190 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

Two - Day 46TH Annual Conference of Vidharbha Arthashastra Parishad
@ Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani Dist. Yawatmal
4th & 5th February, 2023

प्रा. डॉ. सुभाष रा. गुर्जर

अर्थशास्त्र विभागप्रमुख
कला वाणिज्य
महाविदयालय,
वरवट बकाल जि.
बुलडाणा

## कोविड-19 चे विविध क्षेत्रावरील परिणाम

*डिसेंबर 2019 मध्ये चीनमध्ये कोरोना नावाच्या विषाणुजन्य साथीच्या रोगाचा प्रसार झाला. जानेवारी 2020 मध्ये भारतात कोरोना विषाणूचा पहिला रुग्ण केरळमध्ये आढळून आला. भारत सरकारने आणि 22 मार्च 2020 ला एक दिवसाचा जनता कर्फ्यू आणि 23 मार्च पासून 21 दिवसाचा लॉकडाऊन जाहीर केला. दुसऱ्या टप्प्यात 20 दिवसाचा लॉकडाउन, त्यानंतर पुन्हा दोनदा लॉकडोऊन जाहीर केले. 1960 च्या दशकामध्ये जगात प्रथम कोरोना संसर्ग विषाणु दिसून आला. हा विषाणु काही कोंबड्यामार्फत संसर्ग होऊन दोन रुग्णामध्ये दिसून आला. काही कालावधीनंतर Human corona virus 02E व Human corona virus OC हे नाव त्याला देण्यात आले. 2003 Sars - C OVHC, OVNL, 2004 मध्ये HKU, 2019 मध्ये meras - C OV, SAR AV covi - 2 व Neov म्हणून ओळखले जात होते. 2019 नंतर covid-19 या नावाने मानव संसर्गजन्य रोग असे म्हटल्या जगात जावू लागले. covid-19 या विषाणूने संपूर्ण धुमाकूळ घातला आहे. WHO च्या अहवाला नुसार 117 पेक्षा जास्त देशामध्ये कोरोनाचा प्रसार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था सुद्धा 18.3% नी घटल्याचे दिसून येते.*

**प्रस्तावना :-**

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या कोविड - 19 साथीचा रोग, जगभर पसरलेला आहे. या साथीच्या रोगामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला असून त्यामुळे शिक्षण, आरोग्य, औदयोगिक क्षेत्र, कृषी क्षेत्र, हॉटेल, पर्यटन क्षेत्र, सेवा क्षेत्र, रोजगार क्षेत्र, आयात निर्यातक्षेत्र इत्यादीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे समाजजीवनावर व आर्थिक जीवनावर कधी नव्हे असे बदल झाल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दीष्टे :-**

1. आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणामाचा अभ्यास करणे
2. उदयोग क्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास करणे.
3. कृषीक्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास करणे.
4. रोजगारीवरील परिणामाचा अभ्यास करणे.
5. शैक्षणीक क्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास करणे.
6. पोल्ट्री उद्योगावरील परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पदधती :-**

वरील विषयावरील संशोधनाचे अध्ययन करण्याकरिता द्वितीय सामुग्रीचा अभ्यास करण्यात आला. त्याअंतर्गत विविध वर्तमान पत्रे , विविध वेबसाईट, मासिक, प्रकाशित लेखांचा सामुग्री- करिता विचार करण्यात आला. कोविड- 19 चा विविध क्षेत्रावर झालेला परिणाम पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

**१. आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणाम :-**

जानेवारी 2020 पासून भारतात सुरु झालेल्या कोरोना महामारीमुळे भारताच्या आयात निर्यात व्यापारावर विपरित परिणाम झाल्याचे दिसून येते. जून 2020 मध्ये भारताची निर्यात 12.51% इतकी घटली तर आयात 47.59 % नी घटली. कोरोना महामारीच्या काळात कमी जागतिक मागणीमुळे जून 2020 मध्ये निर्यात 12.51% नी घसरून 21.91 अब्ज डॉलरवर

गेली. त्या तुलनेत जूनमध्ये आयात 47.59% होती. एप्रिल 2020 मध्ये निर्यात 60.28% आणि मे मध्ये 36.47 टक्क्यांनी घसरली होती. तसेच जून 2020 मध्ये 47.59 टक्क्यांनी घसरून 21.11 अब्ज डॉलरवर आली त्यामुळे या महिन्यात 0.79 अब्ज डॉलर्स एवढी आंतरराष्ट्रीय व्यापारातील शिल्लक निर्माण झाली. त्याच प्रमाणे जून 2020 मध्ये तेलाची आयात 55.59% नी घटून 4.93 अब्ज डॉलरवर पोहचली. सोन्याच्या आयातीमध्ये 77.42% नी घट होऊन 77.87 कोटी डॉलर इतकी झाली. यावरून असे दिसून येते की, आंतरराष्ट्रीय व्यापारावर सुद्धा कोरोनाचा कमी अधिक परिणाम झाला आहे.

**2. उद्योग क्षेत्रावरील परिणाम :-**

कोरोनाचा उदयोग क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम झालेला दिसून येतो. लॉकडाउन पूर्वी उद्योग क्षेत्राचा वृद्धीदर जानेवारी 2020 मध्ये 2.1% होता तो जुलैमध्ये - 18.3% झाला. एप्रिल 2020 मध्ये भारतातील उद्योग क्षेत्रामध्ये 38% नुकसान झाले. कोळसा उत्पादन एप्रिल 2019 मधील 3.2% वरून एप्रिल 2020 मध्ये - 15.5% ने घटले आहे. याच कालावधीत कच्च्या तेलाचे उत्पादन - 6.7% वरून - 6.4% इतके राहीले. नैसर्गिक वायू उत्पादन - 0% वरून - 19.9% वेगाने घटले. रिफायनरी वस्तू उत्पादन 4.3 % वरून - 24.2% एवढे झाले. एप्रिल 2020 मध्ये सिमेंट उद्योग उत्पादन 86% नी, वीज उत्पादन 22.7% नी, खते उत्पादन 4.5% नी, कच्चे तेल उत्पादन 6.8% नी घटल्याचे दिसून येते. यावरून असे स्पष्ट होते की, कोविड-19 चा भारतीय उदयोग क्षेत्रावर अत्यंत वाईट परिणाम झाल्याचे सिद्ध होते. परंतु याच काळात सॅनिटायझर, मास्क, पीपीई किट व रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारी औषधी निर्माण करणाऱ्या उद्योगावर अनुकूल परिणाम झाल्याचे दिसून येते.

**3. कृषी क्षेत्रावरील परिणाम :-**

भारतातील 56 % लोकसंख्या प्रत्यक्ष शेतीवर अवलंबून असल्यामुळे कोविड - 19 चा भारतीय शेती क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात प्रतिकुल परिणाम झाल्याचे दिसून येते. संत्रा, मोसंबी, द्राक्षे, कलिंगड, खरबूज, डाळींब, चिकू, आंबे इत्यादी फळे व विभिन्न प्रकारचा भाजीपाला लॉकडाउनमुळे शेतकऱ्यांना विकता आला नाही. वाहतूक सोयी व बाजारपेठ उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांचे हाती आलेले पिक वाया गेले. त्याच प्रमाणे मालाला योग्य मागणी नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना आपला माल शेतातच नष्ट करावा लागला. दुध आणि दुग्धजन्य पदार्थ शिघ्रनाशी असल्यामुळे शेतकऱ्यांना साठवून ठेवता आले नाही. त्यातच मागणी कमी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेती कर्जाचा असह्य ताण, शेतमजूर कामावर येण्याबाबत अनिश्चितता इत्यादीमुळे कृषी उत्पादनावर विपरित परिणाम झाला. अनेक शेतकऱ्यांनी फळे, भाजीपाला यांचे मोफत वाटप केले. कापूस, तूर, सोयाबिन, गहू, मका, ज्वारी, बाजरी, कडधान्ये बाजार बंद असल्यामुळे घरात पडून होते. बाजार व हॉटेल बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल कवडीमोल भावाने विकावा लागला. त्याच प्रमाणे उन्हाळी पिके भूईमूग, तीळ, ज्वारी, मका, सुर्यफूल इत्यादी पिकाचे उत्पादन शेतकऱ्याला घेता आले नाही. बि-बियाणे, खते, किटकनाशके यांच्या टंचाईमुळे शेतीवर विपरित परिणाम झाला. आठवडी बाजार व दुकाने बंद असल्यामुळे जीवनावश्यक वस्तूचा तुटवडा निर्माण झाला. परिणामी शेतकरी व समाजातील वर्गांना आपल्या मुलामुलींचे लग्न पुढे ढकलावे लागले त्यामुळे आर्थिक समस्येबरोबरच सामाजिक समस्या सुद्धा निर्माण झाल्याचे दिसून येते.

**4. रोजगारीवरील परिणाम :-**

कोरोना महामारीमुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊन मुळे विविध कामधंदे, उदयोग, छोटी मोठी दुकाने बंद करण्यात आली. परिणामी रोजगारीवर विपरित परिणाम झालेत. रोजगार गेल्यामुळे आवश्यक वस्तू विकत घेण्यासाठी गरीब मजूरांजवळ पैसा नव्हता. त्यामुळे मजूर वर्गाचे हाल झालेत. विविध क्षेत्रातील रोजगार गेल्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. मार्च 2020 मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर हा 8.7% होता तो एप्रिल 2020 मध्ये 127.1% वर

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

पोहचला हा सर्वाधिक बेरोजगारीचा दर होता. दवाखाने, मेडीकल्स व अन्नधान्य विषयक सेवा वगळता उद्योग, व्यापार व इतर व्यवसाय बंद पडले. त्यामुळे अनेक मजूरांना आपल्या गावी पायी जावे लागले त्यात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. टाळेबंदीच्या काळात संघटीत क्षेत्रातील एकूण 12.2 कोटी लोकांच्या नोकऱ्या गेल्या. त्यामध्ये 9.13 कोटी लहान व्यापारी आणि मजूर होते. तर 1.78 कोटी पगारदार व्यक्तींच्याही नोकऱ्या गेल्या तर स्वयंरोजगारातील 1.82 कोटी लोक या कालावधीत बेरोजगार झाले. याच काळात अनेक मंजूर आपल्या मुळगावी परत आल्यामुळे शेती क्षेत्रातील मजूर संख्येत वाढ झाल्याचे दिसून आले. डिसेंबर 2020 मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर 9.06% झाला तर 24 जानेवारी 2021 मध्ये हा बेरोजगारीचा दर कमी होऊन 6.63% झाला. तात्पर्य कोरोनाच्या लॉकडाउनचा सर्वाधिक प्रभाव हा रोजगार क्षेत्रावर झाल्याचे दिसून आले.

**5. शैक्षणिक क्षेत्रावरील परिणाम :-**

कोरोनाला प्रतिबंध करण्यासाठी अनेक देशातील शैक्षणीक संस्था बंद करण्यात आल्या. युनेस्कोच्या अहवालानुसार एप्रिल 2020 मध्ये 188 देशांमध्ये 154 कोटी विद्यार्थ्यांना घरी राहावे लागले. भारतात 151 लाख शाळा बंद पडलेल्या होत्या त्यामुळे 26 कोटी विद्यार्थी व 89 लाख शिक्षकांना घरी बसावे लागले. तसेच 50 हजार उच्च शिक्षणसंस्था बंद पडल्यामुळे 3.70 कोटी विद्यार्थी आणि 15 लाख शिक्षकांना घरी बसावे लागले. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. त्यावर उपाय म्हणून online च्या माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न केल्या गेला. परंतु त्याला अपेक्षीत यश प्राप्त झाले नाही. कारण ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांजवळ स्मार्टफोन उपलब्ध नव्हते, इंटरनेटची रेंज योग्य प्रमाणात मिळत नसल्यामुळे त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अनेक मुलांना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली. माहिती तंत्रज्ञान, यूट्यूब, मोबाइल फोन, दूरशिक्षण इत्यादीमार्फत शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. माहिती तंत्रज्ञानामुळे प्रसार व विस्तार संधी वाढविण्याला मदत झाली. भारतात 2020 मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या 68.45 कोटी होती तर मोबाईल फोन वापरणाऱ्याची संख्या 48.82 कोटी पर्यंत पोहचली. त्याच प्रमाणे इंटरनेटसह स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या 40.72 कोटीपर्यंत पोहचली या सर्व सुविधा वापरणाऱ्यांची संख्या भारतात केवळ 52% च आहे. परिणाम स्वरूप ज्या अपेक्षाने ही योजना सुरु करण्यात आली ती सर्वापर्यंत पोहचू शकली नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहीले व याच कालावधीत शिक्षणाचा दर्जासुद्धा घसरल्याचे दिसून आले.

**6. पोल्ट्री उद्योगावरील परिणाम :-**

महाराष्ट्रात बॉयलर चिकन ची एका दिवसाची मागणी अंदाजे दोन हजार आठशे आहे. कोंबडीमुळे कोरोनाची लागण होते या अफवेमुळे पोल्ट्री उद्योगाला मोठा फटका बसला. परिणामी उदयोजकांना सेल लावून कोंबड्याची विक्री करण्याची वेळ आली. 100 रुपयाला चार कोंबड्याची विक्री करण्यात आली. त्याचबरोबर अंड्याची ही मागणी कमी झाली. पालघरच्या एका उदयोजकाने 9 लाख अंडी, 1.5 लाख पिल्ले आणि 1 लाख कोंबड्या जमिनीत पुरवून त्याची विल्हेवाट लावली या परिस्थितीमुळे पूर्ण देशातील पोल्ट्री उद्योजक आर्थिक संकटात सापडल्याचे चित्र होते.

**निष्कर्ष :-**

कोविड -19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर परिणाम झाले असल्याचे दिसून येते. देशातील आंतरराष्ट्रीय व्यापार, उदयोग क्षेत्र, कृषीक्षेत्र, रोजगारी, शिक्षण, पोल्ट्री इत्यादी क्षेत्र प्रभावित झाले असले तरीपण या महामारीमुळे पर्यटन स्थळे, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे बंद असल्यामुळे रिक्षा, मोटार, हॉटेल्स, लॉज, फुले, खेळणी इत्यादी व्यवसाय बंद पडल्यामुळे पर्यटन व्यवसाय व व्यापारी वर्गावर विपरित परिणाम झाला. याशिवाय बँकिंग क्षेत्र, विदेशी गुंतवणूक क्षेत्र, विमा क्षेत्र, सेवाक्षेत्र, मत्स्यव्यवसाय इत्यादी क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाला. एकंदरीत



CamScanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399
RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
ISSN 2277-8071

कोरोनाने मानव जातीला 'कोणी कोणाचे नसते' ही शिकवण दिल्याचे सिदध होते.

संदर्भ :-

1. योजना मासिक, एप्रिल 2020
2. दै. सकाळ, 30 मे 2020
3. दै. पुण्यनगरी 25 जाने. 2021
4. www.economictimes.com
5. www.newindia.com
6. www.esakal.com 5 Jan 2021

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

®

# Vidyawarta®

Issue-46, Vol-11, April to June 2023
Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2023
Issue 46, Vol-11

Date of Publication
01 June 2023

Editor
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) Towards Sustainable Strategies for Tribal Communities: Promoting Human-...
**Anoop K.A, Dr. Sandhya R S, Thiruvananthapuram** ||63

14) Education in India under Five Year Plans – A Critical Analysis
**Dr. Poonam Chaturvedi, Lucknow** ||72

15) Opportunities and Challenges of E-Banking in India
**Tejas Manohar Dasnurkar, Dist - Jalgaon** ||78

16) दलित साहित्य चळवळीतील दलित नियतकालिकांचे योगदान
**प्रा.डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे, ता.जि. धुळे** ||82

17) अहमदनगर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा ...
**सौ. औताडे नयना मच्छिंद्र, नांदेड** ||89

18) शाश्वत विकास आणि पर्यावरण
**प्रा.डॉ.सुभाष रामचंद्र गुर्जर, जि. बुलडाणा** ||92

19) पर्यावरणीय जाणिवा समृद्ध करणारे मराठी साहित्य : काही संदर्भात्मक नोंदी
**डॉ. सूर्यप्रकाश जाधव, नांदेड** ||95

20) कोरोना काळात ऑनलाईन शिक्षणामुळे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे मानसिक ...
**प्रा. मनोजकुमार धनराज कळंबे, जि. नागपूर** ||98

21) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्याच्या विकासासाठी कृती कार्यक्रमांच्या ...
**श्री. नाथाजी नामदेव कांबळे, डॉ. वडवान महजबीन म. असलम, सोलापूर** ||103

22) 'राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२०' कार्यवाही व आराखडा – एक अभ्यास
**प्रा. कौठाळे मनिषा लक्ष्मणराव, पुणे** ||106

23) राजर्षी शाहूमहाराज यांचे सामाजिक व शिक्षण विषयक विचार – चिकित्सक अभ्यास
**सहा.प्रा.खैरे भगवान विठ्ठल** ||110

24) संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क
**डॉ.शरद मधुकर कुळकर्णी, ता.जि.धुळे** ||115

25) निहाल जमातीची परंपरागत कलाकृती
**रश्मी** ||119

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

बर्वे, बी. एन. (२००६). ताण आणि आरोग्य विषयक मानसशास्त्र. विद्या प्रकाशन : नागपुर.

बर्वे, बी. एन. (२०१०). जीवनमानाचे मानसशास्त्र. विद्या प्रकाशन : नागपुर.

महाजन, शशिकला (जानेवारी—मार्च २०१३) संतुलित व्यक्तिमत्त्वासाठी भावनिक परिपक्वता. शिक्षण आणि समाज, अंक २, पान क्र. ३४—३७.

मंगल, एस. के. आणि मंगल, शुभ्रा. बाल्यावस्था आणि वृद्धिंमुख बालक, पी.एच. आय. लर्निंग प्रायवेट लिमिटेड : दिल्ली.

साहिन, परवीन (जुलै २०१२) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वता आणि शैक्षणिक संपादणूक यांच्या संबंधाचा अभ्यास. शिक्षण तरंग, अंक ३, पान क्र. २९—३१.

❑❑❑

**18**

# शाश्वत विकास आणि पर्यावरण

**प्रा.डॉ.सुभाष रामचंद्र गुर्जर**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल,
जि. बुलडाणा

***********

**प्रस्तावना :**

नैसर्गिक संसाधने आणि जैवविविधता यांचे संरक्षण करण्याच्या उद्दिष्टाने आंतरराष्ट्रीय संघटनेने प्रकाशित केलेल्या पर्यावरण आणि विकास याविषयाशी संबंधित ब्रूटलैंड या जागतिक संरक्षण समितीने १९८० मध्ये शाश्वत विकास (Sustainable Development) ची संकल्पना सर्वप्रथम मांडली. शाश्वत विकासाचा अर्थ स्पष्ट करतांना त्यांनी शाश्वत विकास म्हणजे चालू पिढीच्या गरजांची पूर्तता करतांना भावी पिढीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड करावी लागणार नाही असा विकास होय. आर्थिक विकास हा शाश्वत असला पाहिजे म्हणजे तो निरंतर चालू राहीला पाहीजे, १९९९—२००० मधील जागतिक विकास अहवालात आर्थिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्टे असे सांगितले की, सर्व लोकांच्या जीवनात गुणात्मक सुधारणांची निर्मिती सतत होणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. विकास व पर्यावरणाशी संबंधित जागतिक आयोगाने शाश्वत विकास या संकल्पनेचा विकास केला,म्हणून १९९० पासून आंतरराष्ट्रीय संघटनांनी पर्यावरणाची सातत्यपूर्णता आली चिरंतन विकास या संकल्पनांना महत्व द्यायला सुरुवात केली.

शाश्वत विकास हा लोकांसाठी संसाधने संपविल्याशिवाय संसाधने वापरण्याचा मार्ग आहे. याचा अर्थ पर्यावरणाची हानी नकरता विकास करणे.आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास जसे जमिनीचा ऱ्हास, भूक्षरण, वायूप्रदूषण, जलप्रदूषण, वृक्षतोड

इत्यादींच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

**शाश्वत विकासाच्या व्याख्या :—**

१) ब्रूटलैंड आयोगाची व्याख्या :— शाश्वत विकास म्हणजे असा विकास की, ज्याच्याद्वारे भावी पिढ्यांच्या त्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानकालीन गरजा पूर्ण केल्या जातात.

२) एडवर्ड बारबिअरच्या मते :— शाश्वत विकास म्हणजे सामाजिक, विकासाला पर्यावरणीय विकासाची जोड देणे.

३) के.परीख यांच्या मते :— अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादनाची जी शक्यता आहे. त्या शक्यतेचे रक्षण करण्यासाठी वस्तू व सेवा प्राप्त करून त्याचा पुरवठा करणे म्हणजेच शाश्वत विकास होय.

तात्पर्य शाश्वत विकासाची संकल्पना हि पर्यावरणाशी संबंधित आहे. शाश्वत विकास या संकल्पनेत पर्यावरण रक्षण आणि विकासाला महत्वाचे स्थान आहे.

**शाश्वत विकासाची उद्दीष्टे :—**

१) पर्यावरणीय समस्या कमी करणाऱ्या विकासाचा प्रचार प्रसारकरणे.

२) मानवी जीवनाचा गुणात्मक विकास घडवून आणणे.

३) भावी पिढ्यांसाठी पर्यावरणाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता करता सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करणे.

४) पृथ्वीवरील नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक संसाधने व संपत्तीचा साठा संवर्धन करून तो पुढील पिढीकडे हस्तांतरीत करणे.

५) सामाजिक जीवनात सहभागाच्या समान संधी देऊन सुदृढ व आरोग्यपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक जीवनासाठी सहकार्य करणे .

६) नैसर्गिक व भांडवली साधनांचा साठा संपुष्टात येवू नये.असा शाश्वत विकास करणे.

**पर्यावरणीय संकट :—**

विकसित, अल्पविकसित व विकसनशील देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये नैसर्गिक संसाधनांची भूमिका महत्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे देशाच्या औद्योगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सुद्धा नैसर्गिक साधनाचे अनन्यपूर्ण स्थान आहे . त्यामुळेच डब्ल्यू .ए .लुईस म्हणतात. कोणत्याही देशाच्या विकासाची पातळी व स्वरूप हे त्या देशात उपलब्ध असलेल्या संसाधनाद्वारे सिमित होत असते.

सध्या आर्थिक विकासाच्या अनुषंगाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिवापर व गैरवापर होत असल्यामुळे पर्यावरणीय संकटाला सामोरे जावे लागत आहे.त्या संकटामुळे मानवी जीवनावर व आरोग्यावर विपरीत परिणाम होतांना दिसून येते. विकासाच्या संकल्पनेमुळे प्रदुषणात वाढ, जल, वायु, भूप्रदूषण, विकीरण, ध्वनी प्रदूषण यामुळे सजीव सृष्टीवर विपरित परिणाम होतांना दिसून येतो.परिणामी पर्यावरणाचा समतोल बिघडून मानवाला अनपेक्षीत घटनांना सामोरे जावे लागत आहे.

**पर्यावरणीय संकटाची कारणे :—**

१) लोकसंख्या विस्फोट :— लोकसंख्या वाढीच्या उच्चदराचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो.परिणामी पर्यावरणीय साधनांची मागणी वाढते. परंतु त्यांचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे संसाधनाचा अतिवापर व गैरवापर होतांना दिसून येतो.

२) औदयोगिकीकरणात वाढ :— औदयोगिकीकरणाची जलदगतीने वाढ झाल्यामुळे जंगलतोड, सुपीक जमीनी इमारती, रस्ते, पुल, धरणे इत्यादीकरिता वापरल्यामुळे नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास होत असल्याचे दिसून येते.

३) शहरीकरण :— ग्रामीण लोकसंखेच्या स्थलांतरणामुळे शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधावर ताण पडून पर्यावरणाचे नुकसान होत असल्याचे सिद्ध होते .

४) वृक्ष तोड :— ग्रामीण व शहरी भागात विविध कारणाकरिता मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जाते. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडून अनेक समस्या निर्माण होतात.

५) कृषी निविष्ठांचा अतिरेकी वापर :— शेतकरी अधिक उत्पादन घेण्याच्या दृष्टीने रासायनिक खते, कीटकनाशके इत्यादीचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामळे शेतकरी, कामगार व लोकांना आरोग्याच्या विविध समस्या भेडसावत आहे.

६) आर्थिक क्रियांमध्ये वाढ :— आर्थिक विकासाच्या वाढीबरोबर लोक अनेक वस्तू व सेवांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात.त्यामुळे उत्पादनात वाढ होवून त्यातून



CamScanner

निर्माण झालेला कचरा पर्यावरणाचे संतुलन बिघडविते.

७) स्वयंचलित वाहनांच्या संखेत वाढ :– आर्थिक विकासाबरोबरच वाहतुकीकरिता मोठ्या प्रमाणात वाहनांचा वापर करण्यात येतो. त्यातून निघालेल्या धुरामुळे वातावरणात Carbon dioxide, Carbon monoxide इत्यादी विषारी वायू बाहेर पडतात. त्याचा वातावरणावर व मानवावर विपरीत परिणाम होतो.

**पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन :–**

शाश्वत विकासामध्ये पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची कल्पना मुख्यस्थानी आहे. विकासाच्या प्रक्रीयेमध्ये पर्यावरणाची हानी, प्रदूषणात वाढ, पर्यावरणाचा समतोल बिघडतो हे खरे असले तरीपण विकास थांबविता येणार नाही. विकासाची प्रक्रीया राबवितांना पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण होणार नाही. याकरिता अधिकाधिक प्रयत्नरत असले पाहिजे. म्हणजेच नैसर्गिक संसाधनाचा काटकसरीने वापर करणे, पुढील पिढीसाठी जतन करून ठेवणे, तिच्यामधे वाढ करण्याचे प्रयत्न करणे. अशाप्रकारचे तंत्रज्ञान वापरले पाहीजे. त्याचप्रमाणे टाकाऊ पदार्थाचे चक्रीकरण व पुनर्वापर करणे, प्रदूषण नियंत्रणाचे सुधारीत तंत्रज्ञान वापरणे अशा पद्धतीचा वापर करणे आवश्यक आहे. सद्यास्थितीत वाढत्या पर्यावरण समस्येमुळे अनेक देशांचे लक्ष शाश्वत विकासाकडे वेधले आहे. या समस्येवर चर्चा करण्यासाठी दरवर्षी वसुंधरा शिखर परिषद आयोजीत करण्याचे ठरले. १९८८ मध्ये हवामान बदलाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय चौकशी समिती तयार करण्यात आली. जेणेकरून हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी करता येईल. आज विविध कारणामुळे जागतिक तापमानात सातत्याने वाढ होत आहे.हि समस्या जगभर दिसून येते. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा अनेक देश प्रयत्न करतांना दिसून येतात. पर्यावरण रक्षणाच्या बाबतीत समुचित तंत्रज्ञान वापरण्याची संधी अधिक महत्वाची ठरते. अविकसित व विकसनशील देशांमध्ये या प्रश्नाचे स्वरूप भीषण व चिंताजनक आहे. अशा स्थितीत चालू शतकात २०१६ ते २०३० या कालावधीत पर्यावरण व विकासासंबंधी शाश्वत विकासाची चार उद्दिष्टे संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केली आहे.

१) वैश्विक हवामान बदल
२) जलजीवन व जलसंपत्तीचे रक्षण व संवर्धन
३) जमिनीवरील नैसर्गिक साधनसंपत्ती
४) शांतता व न्यायव्यवस्था टिकविणाऱ्या संस्था निर्माण करणे

**पर्यावरण संतुलन राखून शाश्वत विकासाची साधने :–**

१) पवनऊर्जा :– औष्णिक तथा अणूऊर्जेद्वारे तयार करण्यात येणाऱ्या उर्जेशिवाय नैसर्गिकरीत्या पवनउर्जेचा वापर योग्य ठरू शकतो.

२) सौरऊर्जा :– नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेल्या सूर्यप्रकाशापासून उर्जा निर्माण केल्यास पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होऊ शकते.

३) पीकपद्धतीत बदल :– शेतकऱ्यांनी दरवर्षी एकसारखे पिक शेतामध्ये न घेता आलटून पालटून पिके घेतली व रासायनिक खते व कीटकनाशकांचा कमी वापर करून सेंद्रीय पद्धतीने शेती केल्यास पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल.

४) शाश्वत बांधकामे :– बांधकाम करीत असतांना चिरंतररित्या टिकाऊ असलेले बांधकाम केल्यास पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही.

५) पाण्याचा कार्यक्षम वापर व साठा :– पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीकोनातून पाण्याचा कार्यक्षमरित्या योग्य वापर करून पाण्याचा साठा वाढविण्यावर भर दिल्यास शाश्वत विकास कार्यान्वित होऊ शकतो.

६) हरित परिसर :– योग्य जीवन जगण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन साधण्याकरिता घरे, कारखाणे, रस्ते, संस्था, कार्यालये इत्यादी ठीकाणी विविध प्रकारची झाडे लावून परिसर हिरवा करण्याचा प्रयत्न करावा.

७) शाश्वत वनीकरण :– शासन व लोकसहभागातून पर्वत, जंगल, पठार, रस्ते, पडीक जमीन इत्यादी ठीकाणी विविध प्रकारचे झाडे लावून वनांचे संवर्धन व संरक्षण केल्यास पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल.

८) कागद विरहीत व्यवहार :– सध्या अर्थव्यवस्थेमध्ये विकासाच्या अनेक योजना, अहवाल, शासकीय निमशासकीय कार्यालये शिक्षणव्यवस्था यामध्ये मोठ्या प्रमाणावर कागदाचा वापर केला जातो.



CamScanner

सदर कागद तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जाते. परंतु हे सर्व व्यवहार कागदविरहीत करण्याचा शासनाने प्रयत्न केल्यास पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल.

**सारांश :—**

आज जगातील अनेक देश आपल्या विकासाचा दर वाढविण्याचे दृष्टीने औद्योगिकरण, पायाभूत सुविधा, सेवा सुविधा इत्यादीच्या माध्यमातून प्रयत्न करित आहे. त्यामुळे विकासाकरिता अनेक देशातील पर्यावरणात असंतुलन निर्माण होत आहे. परिणामी ग्लोबल वार्मिंगसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचे परिणाम सर्व जगाला सोसावे लागत आहे. त्याकरिता जगातील सर्व देशांनी एकत्र येवून पर्यावरणाचे संतुलन राखून शाश्वत विकासाची संकल्पना राबविल्यास येणाऱ्या संकटाचा सामना करता येवू शकतो एवढे मात्र खरे ।

**संदर्भ :**

१) गोविलकर विनायक, (२००९) : मानव विकास निर्देशांक, अर्थबोध, दै. सकाळ, पुणे.

२) माथुर रितू, (२०११): 'मानव विकास संकल्पना' यशदा, पुणे.

3) Singhal p.k.&Shrivastav Pankaj, 'challenges in sustainable develomont'

4) Human Development Report – Govt. of Maharashtra & India, United Nation Development program (1990 2000).

5) www.censusindia.gov.in.

6) www.wikipedia.com

□□□

**19**

# पर्यावरणीय जाणिवा समृद्ध करणारे मराठी साहित्य : काही संदर्भात्मक नोंदी

**डॉ. सूर्यप्रकाश जाधव**
नांदेड

***********

साहित्य, समाज आणि निसर्ग हे मानवी जीवनाशी एकरूप झालेले परस्पराश्रयी अविभाज्य स्तर आहेत . मानवी जीवनाला किंबहुना या पृथ्वीवरील सबंध जीवसृष्टीची धारणा उपरोक्त जीवन घटकांच्या आधारे समृद्धपणे संचलित होताना दिसते. साहित्य हे समाजाच्या आणि निसर्गाच्या जीवनदायी सौंदर्याचे संजीवक आणि प्रेरणादायी सचित्र शब्दांकित करून मानवी जीवनाला अभिवृद्धीत करत असते. मानवी जीवन हे आदीम काळापासून निसर्गाच्या सानिध्यातच अभिजातपणे गतिमान झालेले आहे .किंबहुना मानवी जीवन निसर्गाचा एक अविभाज्य भाग आहे. मानवाला त्याच्या अस्तित्वाची मानसिक, बौद्धिक, सामाजिक जाणीव ही निसर्गाच्या माध्यमातूनच मोठ्या प्रमाणात झालेली आहे .निसर्गातील विविध शक्ती आणि स्त्रोत यांना परमेश्वर मानून मानवाने आपल्या विकासाच्या प्रक्रियेला आरंभ केला आहे.

पाऊस, जंगल, सूर्य, नदी, झरे, समुद्र, हवा अशा अनेक नैसर्गिक घटकांच्या संजीवक सामर्थ्याचे अनुभव आणि दर्शन मानवी मनाला जेव्हा जाणवले तेव्हा मानवाने या घटकांना ईश्वरदत्तत्व बहाल करून, त्यांची आराधना सुरू केली. आदीमानवाला चंद्र, सूर्य, पाऊस, पर्वत, नदी यांचे त्याच्या जीवनातील महत्त्वपूर्ण स्थान जेव्हा समजायला लागले तेव्हा त्याने उपरोक्त निसर्ग शक्तींचे सुक्त रचायला सुरुवात केली. प्राचीन कालखंडात वेदातील ऋचा या निसर्गशक्तींचे केलेली



CamScanner